"देव नाही देव्हाऱ्यात", "करीन ती पूर्व", "वाहतो ही दुर्वांची जुडी", "फुलाला सुगंध मातीचा", "सम्राटाचा सूड" व "हिरवा चुडा" अशा कांही नाटकांचा यात समावेश होतो.
श्री नाईक यांनी कांही नाटकांचे तसेच एकपात्री सहिंताचे लेखन केले आहे. यात "गड आला पण सिंह गेला", (विनोदी) "बाप्पाची मुंबई ट्रिप", "सर्गाचेर स्वारी", "नावान किदे आसा", "थु पोरा थु", "बांगडयाचे किर्तन", "चांदोमामा चांदोमामा रुसलास का", "आगशीकार", "वेरें गावात" आणि "मामाच्या गावाला जाऊ" अशा कांही अप्रकाशित संहिंताचा समावेश होतो.

## श्री. केशव कामत
(अभिनय)



प्रसिध्द उद्योजक तसेच हौशी व प्रायोगिक रंगभूमीवरील प्रज्ञावंत कलाकार म्हणून नावलौकीक प्राप्त केलेले पानवेल रायबंदरस्थित श्री केशव काशिनाथ कामत यांनी पानवेलकर नाटय सेवा संघातर्फे "चंद्र होता साक्षीला" या नाटकाद्वारे हौशी रंगभूमीवर पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी सातत्याने सुमारे ३० वर्षे वेगवेगळया नाटकात अनेक दर्जेदार भूमिका साकारुन नाटयरसिकांची वाहव्वा मिळवली आहे. "धुम्मस", "सूर राहू दे", "वेडा वृंदावन", "चांदणे शिंपीत जा", "निष्पाप", "फुटला पाझर पाषाणाला", "लग्नाची बेडी", "नांदा सौख्य भरे", "अमरदान", "फुलाला सुंगध मातीचा", "अबोल झालीस का?", "काळे बेट लाल बत्ती", "अपराध मीच केला", "उंबरठयावर माप ठेविले", "दिवा जळू दे सारी रात्र" व "गुड बाय डॉक्टर" या नाटकातून भूमिका साकारुन त्यांनी त्यांचं अभिनय कौशल्य सिध्द केले आहे.

नाटयक्षेत्रात हौशी रंगभूमीवर त्यांना सोनू (वसंत) रामचंद्र नाईक, श्रीपाद भोसले, उमेश खोलकर, रमेश शिरोडकर रवींद्र आमोणकर, तातोबा वेलींगकर, सुर्या वाघ यांचे मार्गदर्शन त्याना लाभले आहे. प्रसिध्द नाटयकलाकार तथा सिने अभिनेता डॉ. गिरीश ओक व प्रसिध्द अभिनेत्री सविता प्रभूणे या मातब्बर कलाकारांसमवेत "गुड बाय डॉक्टर" नाटकात "डॉक्टरची" भूमिका यशस्वीरीत्या सादर केली आहे. स्पर्धात्मक रंगभूमीवर त्यांनी नवरंग स्टार्स्, पणजी या संस्थेच्या माध्यमातून सहभाग घेतला असून नाटयकलेतील योगदाना बद्‌दल गोव्यात विविध संस्थांकडून वेगवेगळया ठिकाणी त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

## श्री. रामानंद जोशी
(अभिनय)



आकाशवाणीवरुन सुत्रनिवेदक म्हणून निवृत्त झालेले रामानंद जोशी यांनी अभिनय आणि संहिंतालेखन या दोन्हीमध्ये त्यांचा असलेला हातखंडा सिध्द केला आहे. आकाशवाणीसाठी सुमारे १५० नभोनाटयांची निर्मीती त्यांनी केली आहे. कला अकादमीच्या रंगमेळच्या बॅनरखाली त्यांनी "कुड्डे युग" या नाटकात भूमिका साकारली आहे तसेच प्रभाकर सांस्कृतिक संस्था, करंजाळे या संस्थेने निर्मिती केलेल्या नाटयप्रयोगातून त्यांनी स्पर्धेत सहभाग घेतलां. अफसर हुसेन यांच्या "सलाम जिंदगी" त्याचप्रमाणे रविंद्रनाथ टागोर यांच्या "विसर्जन" या नाटकांचे रुपांतर त्यांनी केले आहे. "सुत्रधार नटी", "कथा ही सर्वप्रिय श्री कृष्णाची" व "तेज हे तिमीरातले" या नाटय संहिंताचे लेखन त्यांनी केले असून "असा ही एक इतिहास" ही एकांकिका लिहीली आहे. गिरीजा थिएटर, श्रीस्थळ काणकोण, या संस्थेच्या "अव्यक्त" या लघु चित्रपटासाठी त्यांनी संवाद लेखन केला आहे. त्यांनी अभिनय व संगीत संयोजन केलेली अनेक नाटके विविध ठिकाणी सादर झाली आहेत. यात प्रामुख्याने "हे बंध रेशमाचे", "सौभद्र", "संत गोरा कुंभार", "मिरा मधुरा", "प्रिती संगम", "विठो रखुमाई" व "कैकयी" या नाटकांचा समावेश आहे.

## श्री. रघुवीर सावर्डेकर
(अभिनय)



रघुवीर सावर्डेकर हे उत्तर गोव्याचे उपजिल्हाधिकारी म्हणून सरकारी सेवेतून निवृत्त झाले आहेत. अगदी बाल वयात त्यांनी "बाळ चिल्लया", "भक्त प्रल्हाद" अशा नाटकातून उत्सवी रंगभूमीवर पदार्पण केले. "आसुरी आकांक्षा", "नेकजात मराठा", "सरनोबत", "करीन ती पूर्व", "देव नाही देव्हाऱ्यात" अशा काही नाटकातून उत्सवी रंगभूमीवर भूमिका सादर करुन एक गुणी कलाकार म्हणून ते नावरुपास आले. कला अकादमीच्या मराठी तसेच कोंकणी नाटयस्पर्धेतही त्यांनी आपला सहभाग दिला आहे. "फुलाला सुगंध मातीचा" या नाटकासाठी नेपथ्याचे प्रथम पारितोषिकही त्यांनी पटकावले होते. नवरंग स्टार्स्, पणजी, या संस्थेतर्फे महाराष्ट्र राज्य अंतिम नाटयस्पर्धेत सादर झालेल्या "सभ्य गृहस्थ हो" व "कर्ता कर्म क्रियापद" या नाटकात त्यांनी भूमिका वठविल्या होत्या. काही निवडक नाटकामधून स्पर्धात्मक रंगभूमीवर त्यांनी भूमिका साकारल्या असून "अहो मला जगायंच आहे", "हॅंडस् अप", "महा निर्वाण", "सभ्य गृहस्थ हो", "येरे माझ्या मागल्या", "काळोख देत हुंकार", "पळा पळा पुढे कोण पळे तो", "मिडीया", "कोशिश", "वनवास", "श्री विचित्राची जत्रा" व "माडावेलो कीर शेपडी हालयता" अशा काही नाटकांचा यात समावेश होतो.

कुडचडे येथे संपन्न झालेल्या पांचव्या गोमंतक मराठी नाटय संम्मेलनात त्यांचे रंगभूमीवरील योगदान लक्षात घेऊन सत्कार करण्यात आला होता.

## श्रीमती मंगला जांभळे
(अभिनय)



साकोर्डा, धारबांदोडा सारख्या दुर्गम भागात जन्मलेल्या मंगला श्रीपाद जांभळे यांनी बालवयातच रंगभूमीवर पदार्पण केले. लग्नानंतर ख-या अर्थाने उत्सवी तसेच स्पर्धात्मक रंगभूमीवर सक्रीय सहभाग घेऊन गोव्यातील नाटयक्षेत्रात एक अभिनेत्री म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. १९८५ या वर्षी "सं अमृतमोहिनी" या नाटकातून पार्वतीच्या भूमिकेतून रंगभूमीवर पदार्पण केल्यानंतर "सं. कैकयी" , सं. मदनाची मंजिरी", "सं. सौभद्र", "रायगडाला जेव्हा जाग येते", "इथे ओशाळला मृत्यू", "ययाती", "मला कांही सांगायचं आहे", "अंधारताना", "शल्यक्रिया", "आरण्यक", "तू मम प्रिय सखा", "सं. संत गोरा कुंभार", सं. ययाति देवयानी", "सं. संशयकल्लोळ", "सं. बहकलेला ब्रम्हच्यारी", "प्रतिमेची गोष्ट", "अंबा" इत्यादी नाटकातून प्रमुख भूमिका साकारताना कला अकादमीच्या "अ" व "ब" गट मराठी नाटयस्पर्धा, संगीत नाटक महोत्सव, गोमंत विद्यानिकेतन, मडगांव, राजीव गांधी कला मंदिर फोंडा या संस्थानी आयोजित केलेल्या स्पर्धा व महोत्सवात आपल्या अभिनयक्षमतेचे प्रदर्शन नाटयरसिकांसमोर सादर केले आहे. गोव्यातील नामवंत संगीत व नाटयदिग्दर्शक स्व. नाना शिरगांवकर, राम शिलकर, अभय जोग, विजयकुमार नाईक, मधुकर जोशी यांचे मार्गदर्शन त्याना लाभले आहे. "रुद्र एकांकिकेसाठी त्याना बेळगांव येथे अभिनयाचे प्रशस्तीपत्रक तर वेलींग येथील स्पर्धेत अभिनयाचे द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. राजीव कला मंदिर आयोजित महिला नाटयस्पर्धेत "अंबा" नाटकातील सत्यवतीच्या भूमिकेसाठी अभिनयाचे प्रशस्तीपत्र मिळाले आहे.

Kala Academy, Campal, Panaji - Goa 403 001
Tel: (0832) 2420451/52/53/54 Fax: (0832) 2420457 Email: kalaacademygoa@yahoo.co.in
Website: www.kalaacademygoa.co.in

कला अकादमी गोवा

गोव्याचे आद्य नाटककार स्व.कृष्णंभट्ट बांदकर
यांच्या जयंतीप्रित्यर्थ आयोजित

# गोमंत रंगभूमी दिन

## गोमंतकीय रंगभूमीवर योगदान
## दिलेल्या नाट्यकलाकारांचा गौरव सोहळा



प्रमुख पाहुणे
**श्री बाबा पार्सेकर**
नामवंत गोमंतकीय रंगकर्मी

कार्यक्रमाचे अध्यक्ष
**मा.श्री गोविंद गावडे**
कला व संस्कृती मंत्री, गोवा सरकार
व अध्यक्ष, कला अकादमी गोवा

सन्माननीय अतिथी
**श्री दौलतराव हवालदार**
मा.कला व संस्कृती सचिव,
गोवा सरकार

गुरुवार दि. २३ ऑगष्ट २०१८
स्थळः दिनानाथ मंगेशकर कलामंदिर, कला अकादमी संकुल,
पणजी-गोवा

# कृष्णंभट्ट बांदकर पुरस्कार प्राप्त रंगकर्मी

## वर्ष २०१७



### श्रीमती आश्विनी जांबावलीकर
(संगीत दिग्दर्शन व अभिनय)

श्रीमती आश्विनी जांबावलीकर गोव्यातील एक नामवंत नाटयकलाकार, दिग्दर्शिका, गायिका, संगीतकार, दूरदर्शन व आकाशवाणी कलाकार व गोव्यातील पहिल्या महिला ऑर्गन वादक म्हणून गोमंतकीय रसिकांना परिचित आहेत. वयाच्या सातव्या वर्षी 'सं. नेकजात मराठा' या नाटकातून रंगभूमीवर पदार्पण केले. त्यानंतर आजतगायत महाराष्ट्रातून, सांगली, कणकवली, दोडामार्ग तसेच कारवार व गोव्यातील खेडोपाडयातून शेकडो नाटकातून विविध भुमिका साकारल्या आहेत. नाटय क्षेत्रात श्रीमती आश्विनी जांबावलीकर यांना श्री. काशिनाथ शिरोडकर, श्री. विश्वनाथ नाईक, श्री. मारीयान डिसोझा, सुकडाराम आडपईकर, श्री. महाबळेश्वर रेडकर इत्यादींचे मार्गदर्शन लाभले आहे. संगीत 'तुका आकाशा येवढा' या नाटकांचे दिग्दर्शन व संगीत ऑर्गन साथ देऊन शिर्डी संस्थानसह इतस्त्र यशस्वी प्रयोग सादर केले आहे. ' सं. संशयकल्लोळ' मधील रेवतीच्या भुमिकेसाठी पं. जयकृष्ण भाटीकर व सिने अभिनेत्री आशालता वाबगांवकर यांच्या हस्ते उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला आहे. सं. शारदा, सं. तुकाराम, सं. देवमाणूस, सं. तुका आकाशा येवढा व काही फार्सिकल नाटके त्यानी दिग्दर्शित केली आहे. आतापर्यंत गोवा सरकारचा यशोदामिनी पुरस्कार, नादब्रह्म अकादमीचा जीवनगौरव पुरस्कार इत्यादि प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.



### श्री. तुळशीदास राऊत
(अभिनय)

तुये, पेडणे येथील रहिवाशी असलेले तुळशीदास राऊत यांनी हौशी रंगमुभीवर सम्राटाचा सूड, खोली पाहिजे, अबोल झालीस का, सूर राहू दें, इथे ओशाळला मृत्यू, तनमाजोरी, निष्पाप, किरवंत इत्यादी नाटकातून तर स्पर्धात्मक रंगभुमीवर 'गणपतवाणी', 'कापूस कोंडयाची गोष्ट', 'आर्य चाणक्य', 'थांबा रामराज्य येतय', 'एक शुन्य रडतं आहे', 'महानिर्वाण', 'एक झुंज वा-याशी', 'अंधायुग' इत्यादी नाटकातून आपल्या कुशल अभिनयाची झलक दाखवून दिली आहे. गोवा कला अकादमी, गोमंत विद्या निकेतन, पार्से युवक संघ, दिल्ली महाराष्ट्रीय शैक्षणीक व सांस्कृतिक संस्था या नामवंत संस्थांच्या नाटयस्पर्धेत तुये स्पोर्टस् क्लब, पार्से युवक संग, लोक बिरादरी, क्षितीज या संस्थांच्या नाटकातून सहभाग दिला आहे. मुंबई येथील नाटय प्रशिक्षण शिबीरात जयदेव हट्टंगडी, वामन केंद्रे, चारुशिला साबळे या मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला आहे. गणपतवाणी या नाटकातील भुमिकेसाठी कला अकादमी, गोवा व पार्से युवक संघ यांच्या नाटयस्पर्धातून अभिनयाची पारितोषिके व प्रशस्तिपत्र प्राप्त झाले आहे. आर्य चाणक्य भुमिकेसाठी अभिनयाचे द्वितीय पारितोषिक, एक शुन्य रडतं आहे साठी अभिनयाचे प्रथम पारितोषिक, महानिर्वाण नाटकातील भुमिकेसाठी अभिनयाचे प्रशस्तिपत्रक कला अकादमीकडून मिळाले आहे. आर्य चाणक्य नाटकातील अभिनयासाठी दिल्ली महाराष्ट्रीय शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था आयोजित नाटयस्पर्धेत अभिनयाचे तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे.



### श्री.नामदेव शेट
(अभिनय)

श्री. नामदेव हूलो शेट यांच्या नाटयप्रवासात त्याना त्यांचे वडिल व गुरु श्री हूलो शेट, स्व. सुर्या वाघ, स्व. वसंत आमोणकर, स्व. मा. नरहरी वळवईकर व श्री दिलीप देसाई या मान्यवर दिग्दर्शकाचे मार्गदर्शन लाभले आहे. गेली ४९ वर्षे श्री नामदेव शेट यांचा नाटय क्षेत्रात वावर आहे. अनेक एकांकिका स्पर्धातून व गोव्यात तसेच गोव्याबाहेर सहभाग देऊन अभिनयासाठीची ९ प्रथंम क्रमांकाची परितोषिके व दिग्दर्शनासाठी ५ प्रथंम क्रमांकाची पारितोषिके प्राप्त केली आहे. 'डोंगर माथ्यार पेटलो उजो' या विष्णू वाघ लिखीत नाटकातील त्यांच्या भुमिकेसाठी अभिनयाचे प्रथम पारितोषिक प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र राज्य नाटय महोत्सवात 'नलदमयंती' व 'नोट लाविन तिथे गुदगुल्या' या नाटकातील भुमिकांसाठी अभिनयाची प्रशस्तिपत्रे प्राप्त झाली आहेत. टी.एम फाऊंडेशन, मणिपाल यांच्या कोकणी नाटय स्पर्धेत अभिनयाचे द्वितीय पारितोषिक तर संकल्प, कुडचडे, यांच्या नाटयस्पर्धेत अभिनयाचे प्रथंम पारितोषिक प्राप्त केले आहे. जवळ जवळ २५० नाटकांचे दिग्दर्शन केले आहे. श्री नामदेव शेट यांना अनेक पुरस्कार व सत्काराने संन्मानित करण्यात आले असून यामध्ये ११ वे गोमंतक नाटय संम्मेलन, राष्ट्रीय सह्याद्री नाटय कलाभुषण पुरस्कार, कोल्हापुर, दिव्य दृष्टी दाता नॅशनल ॲवार्ड, मुंबई यांचा समावेश आहे.



### श्री.शिवाजी देसाई
(अभिनय)

श्री. शिवाजी गणपत देसाई यांनी गेली ५० वर्षाहून अधिक काळ गोमंतकीय उत्सवी, हौशी व स्पर्धात्मक रंगभूमीवर आपले योगदान दिले आहे. सामाजिक, पौराणिक व ऐतिहासिक नाटकातून त्यांनी विविध भुमिका साकारल्या आहे. तांबडी सुर्ला येथील बाराभूमी नाटय मंडळाचे ते संस्थापक सदस्य आहेत. 'उंबरठयावरी माप ठेविले' या नाटकातील भुमिकेसाठी गोवा कला अकादमीच्या नाटयस्पर्धेत त्यांना अभिनयाचे रौप्यपदक तर गोमंतक मराठी अकादमीच्या संगीत नाटक स्पर्धेत सं. पंडितराज जगन्नाथ या नाटकातील मन्सूरखाँच्या भुमिकेसाठी अभिनयाचे द्वितीय पारितोषिक व संगीत मृच्छकटिक नाटकातील (२००४) मैत्रेयच्या भुमिकेसाठी अभिनयाचे प्रशस्तिपत्रक मिळाले आहे. गोमंतक मराठी अकादमीने २००९ मध्ये मंगेशी येथे आयोजित केलेल्या पहिल्या नाटय संम्मेलनात त्याना श्रीमती लालन सारंग यांच्याहस्ते गौरविण्यात आले होते. जवळ जवळ २४ संगीत नाटकातून अभिनेता व दिग्दर्शक म्हणून त्यांनी योगदान दिले आहे.



### श्री.रामकृष्ण सुर्लकर
(संगीत दिग्दर्शन)

श्री. रामकृष्ण हिरबा सुर्लकर यांना त्याचे आजोबा कै. गणपत सुर्लकर यांच्याकडून संवादिनी वादनाचे प्रारंभिक मार्गदर्शन व त्यानंतर कै. सखारामबापू बर्वे, कै. दामजी मंगेशकर या विद्वानांचे मार्गदर्शन लाभले. पं. श्रीपादबुवा माडये यांच्या मार्गदर्शनाखाली श्री सुर्लकर यांनी संवादिनीवादन या विषयातील गांधर्व महाविद्यालय मंडळाची संगीत विशारद पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त केली आहे. गोव्यातील उत्सवी, हौशी व स्पर्धात्मक संगीत नाटक रंगभूमिवर सादर झालेल्या अनेक संगीत नाटकांचे संगीत दिग्दर्शन व ऑर्गनसाथ केली आहे. एक नामवंत ऑर्गनवादक म्हणून श्री रामकृष्ण सुर्लकर यांचा नावलौकिक आहे. स्वतःच्या संस्थेमार्फत गाजलेल्या संगीत नाटकांचे प्रयोग कला अकादमी, रविंद्र भवन येथे सादर केले आहे. सं सौभद्र, सं. शारदा सं. मानापमान, सं. एकच प्याला, सं. संशयकल्लोळ, सं. सुवर्णतुला, सं. जय जय गौरीशंकर, सं. ययाति आणि देवयानी या गाजलेल्या नाटकांचे संगीत दिग्दर्शन तसेच ऑर्गन साथसंगत केली आहे. संगीत नाटकांतील ऑर्गनवादनासाठी राजीव गांधी कला मंदिर फोंडा, गोमंतक मराठी अकादमी इत्यादी संस्थानी आयोजित केलेल्या संगीत नाटक महोत्सव व स्पर्धातून प्रथंम तसेच द्वितीय पारितोषिके प्राप्त केली आहेत.



### श्री.नारायण (नाना) आसोलकर
(संगीत दिग्दर्शन)


श्री. नारायण (नाना) आसोलकर यांना श्री मनोहर जुवेकर, श्री दामोदर शेवडे यांच्याकडून संगीत मार्गदर्शन मिळाले आहे. त्यानी शास्त्रीय गायकी बरोबरच ठुमरी, दादरा, अभंग, नाटय संगीत व भावगीत यांचे शिक्षण घेतले आहे. मुंबई येथील वास्तवात कै. बबनराव वरगांवकर व पं. बोरकर यांच्याकडून जुन्या नाटकांच्या चाली व नाटयगीतांच्या मुख्य बंदिशीही शिकून घेतल्या आहे. गोव्यात तसेच महाराष्ट्रात अनेक अभिजात संगीत नाटकांचे संगीत दिग्दर्शन तसेच ऑर्गनसाथ केली आहे. गोमंतक मराठी अकादमीच्या संगीत नाटक स्पर्धेत 'सं. विद्याहरण' नाटकासाठी ऑर्गनवादनाचे प्रथम पारितोषिक प्राप्त केले आहे. सं. धाडिला राम तिने का वनी या संगीत नाटकातील ऑर्गनसाथीसाठी महाराष्ट्र रंगमंच आयोजित स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त केले आहे. रविंद्र भवन, फोंडा आयोजित नांदी स्पर्धेत गोमंत कला निकेतन संस्थेला प्रथम क्रमांक मिळवून दिला आहे. कला अकादमी गोवा, रविंद्र भवन मा. दत्ताराम महोत्सव इत्यादी ठिकाणी संगीत नाटकात ऑर्गन साथसंगत केली आहे. बंदिशींच्या स्वताच्या रचना त्यांनी केल्या असून अनेक रागांमध्ये स्वनिर्मित बंदिशी व तराणे रचले आहेत.

## वर्ष २०१८



### श्री. विनायक देसाई
(अभिनय)

अभिनयाची उत्तम जाण असलेले श्री विनायक देसाई यांनी गोवा सरकारच्या कला आणि संस्कृती संचालनालयाचा कलागौरव पुरस्कार प्राप्त केला असून कला अकादमीच्या तियात्र आणि नाटय स्पर्धेत अभिनयासाठी बक्षिसेही प्राप्त केली आहे. विविध नाटकांच्या सहाशेच्यावर प्रयोगातून त्यांनी भूमिका साकारल्या असून रेडिओच्या नभो नाटयातून व दुरदर्शनवरील मालिका मधून सहभाग दिला आहे. मुंबई दुरदर्शनच्या "और एक कहानी" या हिंदी मालिकेतूनही अभिनयाचे कौशल्य दाखविण्याची संधी त्यांना प्राप्त झाली आहे. १९७२ साली मुंबई येथे प्रख्यात रंगकर्मी श्रीमती विजया मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या नाटयकार्यशाळेत ते सहभागी झाले होते. श्री देसाई यांनी मुलांसाठी ही नाटय कार्यशाळा घेतल्या असून अनेक सामाजिक विषयावरची पथनाटयेही त्यांनी दिग्दर्शित केली आहे तसेच कोंकणी भाषेतील पांच चित्रपटातून त्यांनी भूमिका साकारल्या आहे.



### श्री. नारायण नाईक
(अभिनय)

वेरें बार्देशस्थित नारायण लक्ष्मण नाईक हे निवृत्त हेडमास्तर असून त्या परिसरात नाईकसर म्हणून परिचीत आहे. नवरंग स्टार्स्, पणजी या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी कला अकादमीच्या नाटयस्पर्धेत तसेच गोव्यात वेगवेगळया ठिकाणी उत्सवी रंगभूमीवर विविध नाटयप्रयोगातून भूमिका साकार केल्या आहेत. "महाराणा प्रताप",